**विषयः-** जाहिरात क्र. ०२/२०१६, ०३/२०१६ (मुख्य कार्यालय) तसेच जाहिरात क्र. ०१/२०१६ (परिमंडल कार्यालय) नुसार घेतलेल्या ऑनलाईन परीक्षा रद्द करणेबाबत.

**संदर्भः**-१) मुख्य कार्यालय जाहिरात क्र. ०२/२०१६ व ०३/२०१६ दि. ०२.०३.२०१६

२) परिमंडल कार्यालय जाहिरात क्र. ०१/२०१६ दि. ०२.०३.२०१६

३) दि. ०१.०६.२०१६ ते ०३.०६.२०१ ६ रोजी घेण्यात आलेली ऑनलाईन परिक्षा

-------

महापारेषण कंपनीच्या मुख्य कार्यालयाने जाहिरात क्र. ०२/२०१६, ०३/२०१६ तसेच कंपनी अंतर्गत कार्यरत असलेल्या परिमंडल कार्यालयांनी जाहिरात क्र. ०१/२०१६ अन्वये अनुक्रमे उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सहाय्यक अभियंता (पारेषण), सहाय्यक अभियंता (दूरसंचार), सहाय्यक अभियंता (स्थापत्य) व निम्नस्तर लिपीक (लेखा) ही रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरणे करीता दि. ०२.०३.२०१६ रोजी जाहिराती प्रसिध्द केल्या होत्या. जाहिरातींच्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा दि.०१.०६.२०१६ ते ०३.०६.२०१६ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. तथापि, कंपनीने दि.०१.०६.२०१६ ते ०३.०६.२०१६ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे त्या ऑनलाईन परीक्षा रद्द करण्यात आलेल्या आहेत व सदर ऑनलाईन परीक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांची पुनःपरीक्षा (Re-examination) घेण्याचा निर्णय घेतला आहे. ऑनलाईन परीक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांची पुनःपरीक्षा (Re-examination) घेण्याबाबतची सूचना नजीकच्या कालावधीत प्रसिध्द करण्यात येईल.

दि.०२.०९.२०१६

स्वाक्षरीत/-

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

******